KMM 2017 Session 2

# हर एक फ्रेंड जरूरी होता है?

## Session Plan

भाग १ – सराव गोष्ट — ५ मिनीट
भाग २ – कर्नल सुंदरेसन आर. — ५ मिनीट
भाग ३ – **Variety of Friends!** — १५ मिनीट
भाग ४ – आपण आपल्या मित्राची निवड करू शकता. — ५ मिनीट
भाग ५ – आपण सर्वोत्तम मित्र कसा शोधाल ? — ५ मिनीट
भाग ६ – सर्वोत्तम मित्राची लक्षणे. — ५ मिनीट
भाग ७ – उजळणी — ५ मिनीट

## भाग १ – सराव गोष्ट — ५ मिनीट



एकदा भगवान इंद्र शेतकऱ्यांवर खुप नाराज झाले. त्यांनी जाहीर केले की पुढची १२ वर्षे पाऊस पाडणार नाही. त्यामुळे शेतकरी धान्य पिकवू शकत नव्हते. शेतकऱ्यांनी इंद्राकडे दयेची याचना केली. इंद्राने वरदान दिले की जर शंकराने डमरू वाजविले तरच पाऊस होईल. परंतु इंद्राने शंकराला शेतकऱ्यांना धडा शिकविण्याच्या हेतूने डमरू न वाजवण्याची विनंती केली.

जेव्हा शेतकरी शंकराकडे गेले तेव्हा शंकराने 'मी बारा वर्षानंतरच डमरू वाजवेन' असे सांगितले. निराश झालेल्या शेतकऱ्यांना बारा वर्षे थांबण्याशिवाय दुसरा पर्याय नव्हता. पण त्यांच्या मधील एक शेतकरी निराश झाला नाही. त्याने त्याचे काम चालू ठेवले. पीक येत नव्हते तरी

देखील तो नियमितीपणे शेत नांगरायचा. बियाणे लावायचा, खत घालायचा, मशागत करायचा, इतर शेतकरी त्याची थट्टा करायचे. टर उडवायचे. हयात तीन वर्षे लोटली.



कष्टकरी शेतकऱ्यास आळशी शेतकरी म्हणायचे, 'जर तुला माहित आहे १२ वर्षे पाऊस पडणार नाही, मग तु तुझे कष्ट का वाया घालवित आहे?''

कष्टकरी शेतकरी म्हणाला, 'मला कल्पना आहे, पण मला कष्टाची सवय रहावी आणि मी आळशी बनू नये म्हणून हे कष्ट घेत आहे/करीत आहे. जर आत्ता मी सवय ठेवली नाही तर माझ्या शरीराला व मेंदूला शेती कशी करावी याचा विसर पडेल. १२ वर्षानंतर पाऊस पडल्यावर माझी तयारी कमी पडू नये म्हणून मी हा सराव करीत आहे. हे ऐकून देवी पार्वती भगवान शंकरास म्हणाल्या, 'भगवान कदाचित १२ वर्षानंतर डमरू कसे वाजवायचे हे आपण विसरणार तर नाही ना?' 'अरे, आपण खरच डमरूवाजवायला विसरलो तर नाही ना' –– हया काळजीने शंकराने डमरू वाजवून बघितला. आणि डमरूच्या आवाजाने पाऊस पडण्यास सुरूवात झाली. ज्या कष्टाळू शेतकऱ्याने बी पेरून ठेवले होते. त्यास भरघोस पिक मिळाले. आणि आळशी शेतकरी मात्र हात चोळत बसले.

तुमचा नियमित सरावच तुम्हाला तुमच्या कामात योग्य आणि अचूक बनवितो.

**No blame, No complain, No excuses** हयाचा सराव आपणास कुशल बनवितो.



स्पर्धा ही नेहमी सरावामुळे जिंकता येते. शेवटच्या क्षणी केलेल्या तयारीने नव्हे.

एखाद्या गोष्टीचा सातत्याने केलेला सरावच आपल्याला चांगले यश देवून जाते.

यश संपादन करण्यासाठी नियमित सराव/सातत्यता /उत्तम तयारी हया शिवाय दूसरा पर्याय नाही. हा जीवनाचा नियम आहे.

## भाग २ – कर्नल सुंदरेसन आर. ५ मिनीट

***Run with the soldier, Run for the soldier on 28th May 2017 Pashan LSoM***



कर्नल सुंदरेशन यांचा हेतू शहीद झालेल्या सैनिकांच्या कुटुंबासाठी निधी उभारणे हा आहे. त्यासाठी ते भारताच्या विविध भागांमध्ये दर रविवारी मॅरेथॉन (लांब पट्टयाची धावण्याची शर्यत) चालवितात. ते आत्ता पर्यंत ५० मॅरेथॉन धावले. त्यातील पंचविसावी मॅरेथॉन २८ मे २०१७ रोजी पुण्यात धावले.

त्यांनी मागच्या वर्षी आपल्या मित्रांबरोबर मॅरेथॉन चालविली. त्याच काळात त्यांना दोन वेळा सियाचिन ग्लेशियर मध्ये तैनात करण्यात आले. सियाचिनहून नेटके परत आल्यावर कारगील युद्धाची सुरवात झाली. त्यांना लगेच सियाचिनला पाठविण्यात आले व चालू असलेल्या कारगील युद्धास मदत करण्यास सांगीतले.

कर्नल सुंदरेशन हे कर्तव्य पार पाडत असताना शहीद झालेल्या सैनिकाच्या कुटुंबास १ लाख रूपये देण्यास स्वत:च्या प्रति वचनबद्ध आहेत. भारतातील उदार लोकांकडून मिळालेल्या पाठिंब्यामुळे त्यांनी आपल्या ध्येयाचा एक चांगला भाग गाठला आहे. परंतु तरीही बांधिलकी (वचनबद्धता) पूर्ण करण्यासाठी ते प्रयत्न करीत आहेत. त्यासाठी ते वेगवेगळया संघटनांमध्ये, उद्योजकांकडे जातात, लोकांना प्रोत्साहीत करतात. प्रसंगी सैनिकांविषयीची माहिती लोकांपर्यंत पोहचवितात.

हया विश्वात असे अनेक लोक आहेत कि जे विश्वाला परिवर्तन करण्याची जबाबदारी स्विकारतात आणि त्यांच्या कार्याचा अनेक लोकांवर ठसा उमटतो.

चला तर मग आपण ही No blame, No complain, No excuses ला अंगिकारून स्वत:च्या जीवनाची जबाबदारी स्विकारून आदर्श बनूया.

आपल्याला जर कर्नल सुंदरेशन सारख मित्र असेल तर कसे वाटेल?

## भाग ३ – Variety of Friends! १५ मिनीट

‘हर एक फ्रेंड जरूरी होता है’ ही रिंगटोन आपल्या मोबाईलमध्ये घेवून वर्गात जावे.

आपल्या जीवनात मित्र ही सर्वात महत्वाची व्यक्ती असते.

### प्रत्येकास खालील प्रकारचे मित्र असतात!






- Narad Muni Friend - नारदमुनी सारखा मित्र
- Shy / Silent One - लाजाळू / शांत मित्र
- Organiser Friend - आयोजन करणारा मित्र
- Documentor Friend - नोंदी ठेवणारा मित्र
- Perfecto Friend - आदर्श मित्र
- Mystery Friend - गुढ मित्र
- Large Heart Friend - विशाल हृदयी मित्र
- Toxic Friend - कलुषित मित्र
- Sly Friend - बाताडया मित्र
- Loyal Friend - विश्वासू मित्र
- Fearless Adventurer Friend - धाडसी मित्र
- Gyani Friend - ज्ञानी मित्र
- The Fun One - आनंदी मित्र
- Protective Friend - संरक्षक मित्र
- The Dad Friend - वडिलांसारखा मित्र
- Comedian - विनोदी मित्र
- Inspiring Friend - प्रेरणा देणारा मित्र
- Sleepy Friend - झोपाळू मित्र
- Fashionista Friend - अद्ययावत पद्धती/गोष्टी अनुसरणारा मित्र









- Cool Friend - निवांत मित्र
- Frenemy - प्रेम आणि तिरस्कार दोन्ही असतात मित्र
- Friend of Friend - मित्राचा मित्र
- Friend of Need - गरजेच्या वेळी उपयोगी येणारा मित्र
- Friend of Deed - कर्तव्यपुर्ती करणारा मित्र
- Study Friend - अभ्यासु मित्र
- Shopping Friend - खरेदीच्या वेळी बरोबर असणारा मित्र
- Innocent Friend - निरागस मित्र
- Always Hungry Friend - खादाड मित्र
- Udaas Friend - उदास मित्र
- Rebel Friend - बंडखोर मित्र
- Back Ground Friend - पडद्यामागचे मित्र
- Activity Friend -एका गटातील मित्र
- Home Work Borrowing Friend - गृहपाठ करवून घेणारा मित्र
- Skinny Elephant Friend
- Kanjuice Friend - कंजुष मित्र
- “I believe in YOU” Friend - आपल्यावर विश्वास असणारा मित्र




## भाग ४ – आपण आपल्या मित्राची निवड करू शकता. ५ मिनीट


आपण आपल्या मित्राची योग्य पद्धतीने निवड करणे आवश्यक आहे

अनिल गुरव – सचीन तेंडुलकर व्हिडीओ पाठविणे.


द्रोणाचार्य – कर्ण

अर्जून – कृष्णा

कृष्णा – द्रौपदी



## भाग ५ – आपण सर्वोत्तम मित्र कसा शोधाल ? ५ मिनीट



## भाग ६ – सर्वोत्तम मित्राची लक्षणे. ५ मिनीट

१. तुमच्या चुकीला चुक म्हणण्याचे धाडस असणारा

२. प्रामाणिक

३. गरजेच्या वेळी उपलब्ध असणारा

४. तुमच्यात विश्वास निर्माण करणारा. चेहऱ्यावर स्मित हास्य आणणारा.

५. तुमच्या प्रगतीचा आस धरणारा.

## भाग ७ – उजळणी ५ मिनीट

